# दादरमध्ये बुलढाणा अर्बनचे उद्‌घाटन

## नितीन गडकरी यांनी केला राधेश्याम चांडक यांचा गौरव

**मुंबई :** विदर्भातील अविकसित आणि अपरिचित अशा बुलडाणा जिल्ह्यात ३२ वर्षांपूर्वी बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीची स्थापना झाली. त्या सोसायटीच्या कामाचा पसारा आज महाराष्ट्रात आणि इतर राज्यांत वाढला तो केवळ सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक म्हणजेच भाईजी यांच्या सामाजिक बांधिलकीमुळेच, असे गौरवोद्गार केंद्रीय भूपृष्ठ व परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी काढले.

बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या दादर शिवाजीपार्क शाखेचे उद्‌घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्यामित्त स्वा. विनायक दामोदर सावरकर सभागृहात सोमवार २ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी श्री. गडकरी यांनी स्मार्ट व्हॉल्ट या अत्याधुनिक लॉकर्सचेही उद्‌घाटन केले. याप्रसंगी विधान परिषदेचे सभापती रामराजे नाईक निंबाळकर, अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गिरीश बापट, आनंद अडसूळ उपस्थित होते.